Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ४०] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर २३-२९, २०२१/पौष २-८, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १८१.

**सहाय्यक आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून**

क्रमांक ३९८-एसी-टीआर-२०२१.—

ज्याअर्थी, सार्वजनिक ठिकाणी वातावरणात दिवसेंदिवस ध्वनिची तीव्रता विविध स्त्रोतांमुळे वाढतच आहे. तसेच औद्योगिक कामे, विविध प्रकारची बांधकामे, जनित्र (जनरेटर्स), ध्वनिवर्धक (लाऊडस्पीकर्स), सार्वजनिक सभा, संगीत वाद्ये, वाहनांचे भोंगे व इतर यांत्रिक साधनांमुळे वातावरणातील ध्वनीचे प्रमाण वाढतच आहे. वाढत्या ध्वनी प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थावर अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे वातावरणातील ध्वनीची योग्य पातळी राखण्याच्या हेतूने ध्वनी उत्पन्न करणा-या स्त्रोताचे नियमन व नियंत्रण करणे आवश्यक आहे, असे वाटते;

आणि ज्याअर्थी, ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० चे नियम २ (क) आणि महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग यांचे शासन निर्णय क्र. ध्वनिप्र-२०००-प्र.क. २४-ता.क्र. ३, दिनांक १५ जून २००१ नुसार पोलीस उप आयुक्त यांची ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० ची अंमलबजावणी करणे कामी सदस्यीय प्राधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

ज्याअर्थी, शासन निर्णय क्र. ध्वनिप्र-२००९-प्र.क्र. ९५-ताक-१ पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक २१ एप्रिल २००९ अन्वये व मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठाने वरील याचिकांमध्ये महाराष्ट्र शासन व इतर विभागांनी ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम, २००० ची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता दिनांक २६ फेब्रुवारी २००९ रोजी ठराविक निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी शहरी भागात शांतता झोन जाहीर करणे आवश्यक आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम, २००० चे कलम ३(५) नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी शहरी भागात शांतता झोन त्वरीत जाहीर करुन व शांतता झोनचे फलक लावून आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती प्रसिद्धी करण्याबाबत आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचे आदेश क्र. आ.का.-१२४-२०२०-२१, दिनांक १७ फेब्रुवारी २०२१ रोजी निर्देशित केलेले आहे.

त्याअर्थी, शांतता झोन अंतर्गत येणा-या कोणत्याही ठिकाणी कोणी पुढील पैकी कोणताही अपराध करील तो या अधिनियमाच्या तरतुदीन्वये पोलीस उप आयुक्त, नागपूर शहर यांना असलेले अधिकारानुसार शिक्षा किंवा दंडास पात्र राहील.—

(१) जो कोणी गाणे वाजवील किंवा कोणत्याही ध्वनिवर्धकाचा वापर करील.

(२) जो कोणी ढोल किंवा टमटम वाजवेल किंवा एकतार संगीत किंवा ताणाचे यंत्र फुंकील किंवा कोणतेही वाद्य वाजवेल

(३) जो कोणी गर्दी खेचणा-या एखाद्या स्वरुपाचा, कोणताही नकलांचा, संगीतांचा किंवा इतर कार्यक्रमाचे प्रदर्शन करील.

आणि ज्याअर्थी, शांतता झोन जाहीर करणेपूर्वी नागरिकांकडून लेखी सूचना किंवा आक्षेप पत्र पाठविणेबाबत जाहीर सूचना स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात व वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येत आहे याबाबत नागरिकांकडून कोणतेही आक्षेप असल्यास ३० दिवसांचे आत त्यांनी लेखी अथवा प्रत्यक्ष स्वरुपात सक्षम प्राधिकरणाचे समक्ष सादर करावे. आणि ज्याअर्थी, सक्षम प्राधिकारी म्हणून जनतेकडून आलेल्या सूचना व हरकतींचा विचार करण्यात येईल. शांतता झोन जाहीर करण्याचे क्षेत्र मौजा बिनाकी येथील नागपूर सुधार प्रन्यासचे रहिवासी ले-आऊट अंतर्गत येणा-या सुजाता नगर परिसरात “ गौतम उच्च प्राथमिक शाळेच्या ” परिसरातील सभोवतील १०० मी. क्षेत्र असून सदर चे क्षेत्र शांतता झोन म्हणून जाहीर करण्याचे प्रस्तावित आहे. प्रस्तावित शांतता झोनचे क्षेत्राचे नकाशे नागपूर महानगरपालिकेच्या आसीनगर क्षेत्रीय कार्यालय क्र. ९ येथील सूचना फलकावर नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अभिजीत बाविस्कर,**
सहाय्यक आयुक्त,
आसीनगर झोन क्र. ९,
महानगरपालिका, नागपूर.

नागपूर :
दिनांक १५ डिसेंबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.